म. ग्रं. सं. वाचनालय, ठाणे
विषय बा-वा-
दा.क्र. ९२३४



कांहींतरी नवेंच करा!

BVBK-0401234
BVBK-0401234

# कृषि पंडित

कांहींतरी नवेंच करा : २९

# कृषि पंडित

• •

माधव तांबे

• •

पन्नास नये पैसे

क्र. १२३४ दि. २०।५।७
बा. वा

BVBK-0401234
BVBK-0401234

वोरा ॲण्ड कंपनी
पब्लिशर्स प्रायव्हेट लिमिटेड
३, राउण्ड बिल्डिंग, मुंबई २



आपला देश कृषिप्रधान आहे. परंतु याचा अर्थ ती शेती जुन्यापुराण्या पद्धतीनेंच करावयाची असा नव्हे. नव्या जगांत शेतीच्याहि नव्या नव्या पद्धति आणि साधनें उपलब्ध झालीं आहेत. त्याचा अभ्यास करून त्या पद्धतींचा व साधनांचा अवलंब यापुढें भारतीय शेतकऱ्यालाहि करणें भाग आहे. अर्थात् त्यासाठीं शेतकऱ्यानें साक्षर होणें, शिक्षण घेणें, त्या शास्त्राचा अभ्यास करणें जरूर आहे. नवभारतांतला शेतकरी नुसता नांगऱ्या राहून चालणार नाहीं—आपण आदर्श भारतीय शेतकरी व्हावें असें ज्यांच्या मनांत येत असेल त्यांनीं तर या 'कृषिपंडिता'चें चरित्र अवश्य वाचलें पाहिजे.

श्री : १८७-२ [ ७-६२ ]

© १९५९
वोरा अ‍ॅण्ड कंपनी
पब्लिशर्स प्रा. लि.

प्रकाशक :
अ. ल. गाडगीळ
वोरा अ‍ॅण्ड कंपनी
पब्लिशर्स प्रा. लि. करितां
३, राउंड बिल्डिंग,
काळबादेवी रस्ता,
मुंबई २.

आवृत्ति दुसरी : १९६२

किंमत ५० नये पैसे

मुद्रक :
अनंत जे. शाह
लिपिका प्रेस,
कुर्ला रोड, अंधेरी,
मुंबई ५९.

# कृषिपंडित : दादासाहेब शेंबेकर

" मला गेलं पाहिजे ! माझ्या साखर-कारखान्याचीं कामं अजून तशींच राहिलीं आहेत. मला उशीर होतोय् ! मला गेलं पाहिजे !" हरिहर येथील किर्लोस्कर कारखान्याचे प्रमुख श्री. राजारामपंत किर्लोस्कर यांच्या घरीं बाजी प्रभूच्या निश्चयानें एक वृद्ध-युवा मृत्यूशीं झुंज देत होता. वयाची पंचाहत्तरी चालूं होती––पण रोमरोमांत तरुणाचा उत्साह दाटलेला होता. सारें आयुष्य परिस्थितीशीं झगडण्यांत, तिच्यावर मात करण्यांत गेलें. आणि आतां अंत्यसमयींहि मृत्यूशीं झुंज चालूंच होतीं. हातीं घेतलेलें साखरकारखान्याचें कार्य पूर्ण झाल्याशिवाय प्राण कुडी सोडण्यास तयार नव्हते. तर हटवादी काळ एक पाऊलहि मागें येण्यास राजी नव्हता.

क्षणाक्षणानें मृत्यु पुढें सरकत होता. डॉक्टर आपल्या प्रयत्नांची शिकस्त करीत होते. नोकरांची धांवपळ चालू होती. नातेवाईकांना तारा जात होत्या. फोन होत होते. सर्व प्रतिष्ठित माणसें भोंवतीं गोळा झालीं होतीं. सर्वत्र सचिंत वातावरण निर्माण झालें होतें. दादासाहेबांची काळाशीं लढत चालूं होती. पण काळ शीघ्र पावलांनीं

जवळ येत होता. अखेर मृत्यूनेंच मात केली ! ३१ ऑगस्ट १९५५ चा दुर्दिन उजाडला ! दादासाहेब मृत्युशय्येवर शांत पहुडले होते. चेहऱ्यावर जीवनाची कृतार्थता दिसत होती. बंद गळयाचा लांब अंगरखा, पांढरें शुभ्र धोतर व उपरणें—अगदीं साधा वेश. साधी राहणी व उच्च विचार-सरणीच जणु त्यांच्या रूपानें समोर पहुडली होती !

किर्लोस्करांच्या भव्य बंगल्यावर राहणारे दादासाहेब कोणी कारखानदार नव्हते; एक कर्तबगार शेतकरी होते. शेतकऱ्यास साजेल अशीच त्यांची साधी राहणी होती. फारसें शिक्षण नसतांना, घरचें कमालीचें दारिद्र्य असतांना सरकारी नोकरी सोडून शेतींत पाऊल टाकणारे ते एक बहादुर होते. आयुष्यांत त्यांनीं शेतीशिवाय कोणत्याच गोष्टीचा विचार केला नाहीं. चोवीस तास त्यांनीं शेतीला वाहून घेतलें होतें. म्हणूनच ते भारतीय कीर्तीचे कर्तबगार कृषिपंडित बनले.

**जन्म-शिक्षण-नोकरी**

दादासाहेबांचा जन्म २५ एप्रिल १८८१ रोजीं बारामती येथें झाला. त्यांचें पूर्ण नांव गणेश गोपाळ शेंबेकर. इतिहासप्रसिद्ध घराण्यांत त्यांचा जन्म झाला होता. पेशवाईंतच दादासाहेबांचे पूर्वज कोंकणांतून बारामतीस येऊन राहिले. त्यांचें घराणें इतिहासप्रसिद्ध. सरदार-दरकदारांच्या सावकारांचें. परंतु प्रत्यक्ष

दादासाहेबांच्या बालपणीं मात्र घरांत कमालीचें दारिद्र्य ठाण देऊन बसलें होतें.

नित्योपयोगी गरजा भागणें जिथें अशक्य होतें, तिथें शिक्षण पुरें करणें दादांना कसें शक्य होणार ? कसेबसे सातवीपर्यंत ते जाऊन पोंचले. गणित हा त्यांचा अत्यंत आवडता विषय होता. आपण खूप शिकावें, वकील व्हावें असें त्यांना लहानपणीं वाटे. परंतु विधीनें त्यांच्या नशिबीं पुढचें शिक्षण लिहिलें नव्हतें. अगदीं लहानपणींच आई-वेगळ्या झालेल्या आपल्या मुलाला आपण खूप शिकवावें, मामलेदार करावें असें त्यांच्या वडिलांना—गोपाळरावांनाहि ख़ूप वाटत होतें; पण परिस्थितीपुढें अखेर त्यांना हात टेकावे लागले.

सातवीपर्यंतचें शिक्षण संपतांच दादांना कुटुंबाच्या पोषणासाठीं नगरपालिकेच्या नाक्यावर दरमहा पांच रुपये पगाराची नोकरी धरावी लागली. दरमहा पांच रुपये पगारावर नोकरी करणारा हा तरुण पुढें एक यशस्वी शेतकरी होऊन लाखों रुपयांच्या देणग्या देईल, असें एखाद्या ज्योतिषानें भविष्य केलें असतें तर त्या वेळीं त्यावर कोणाचा विश्वास बसला असता ? थोडे दिवस त्यांनीं ती नोक़री केली. नंतर लवकरच त्यांनीं ती सोडून दिली व इरिगेशन खात्यांत कॅनॉल इन्स्पेक्टरची नोकरी धरली. दरमहा पंधरा रुपये मिळूं लागले. घरांतील मंडळींना आनंद झाला.

दादा मात्र या नोकरीवर खूष नव्हते. एक तर त्यांच्या

स्वतंत्र मनोवृत्तीला नोकरी मानवेना. शिवाय पाटकऱ्याच्या नोकरींतील असत्य वर्तन त्यांच्या मनाला पटेना. चोरून पाणी देणें व त्याबद्दल चोरून पैसे घेणें या गोष्टी त्यांना अन्यायाच्या वाटत. यांचा त्यांना मनस्वी संताप येई. ओळखीच्या लोकांची भीड व अधिकाऱ्यांचें दडपण त्यांना सहन होईना. ते म्हणत, "शेतीला चोरून पाणी देणें किंवा घेणें, हा राष्ट्रद्रोह आहे." सात-आठ वर्षें कशींबशीं नोकरींत काढलीं. अखेर १९१० सालीं त्यांनीं आपल्या नोकरीचा राजीनामा दिला. 'चांगली सरकारी नोकरी सोडली' म्हणून अनेकांनीं त्यांना दोष दिला, आणि त्यांनीं जेव्हां घरीं शेती करावयाची ठरविली, तेव्हां तर त्यांना लोकांनीं वेड्यांतच काढलें !

ब्राह्मण ? आणि शेती ? हें समीकरण लोकांना कसें-सेंच वाटे. परंतु दादांनीं मनाशीं घेतलेला निर्णय वरवरचा किंवा अविचारीपणाचा नव्हता. त्याच्या मागें पूर्ण आत्मविश्वास होता. पाटकऱ्याची नोकरी करीत असतां दादांची तीव्र बुद्धि स्वस्थ बसली नव्हती; ती शेतीचें सूक्ष्म निरीक्षण करीत होती. त्यांच्या जन्मजात चौकस व विवेचक असलेल्या बुद्धीनें त्या नोकरीच्या काळांत कृषिज्ञानाचें बरेंच भांडवल जमा केलें होतें.

बारामतीस दादांचे केशवराव पराडकर म्हणून एक आतेभाऊ होते. त्यांची कांहीं जमीन होती. त्यांच्या मदतीनें दादांनीं शेती सुरू केली—अवघी चार एकर जमीन. पैशाचें पाठबळ तर कांहींच नव्हतें. दृढ निश्चय आणि कष्टाची तयारी हेंच भांडवल. दोन तीन वर्षें अशा प्रकारें शेती केल्यावर त्यांना आत्मविश्वास आला.

## स्वतंत्र शेती

इ. स. १९१३-१४ पासून त्यांनीं स्वतंत्रपणें शेती करण्यास प्रारंभ केला. बारामतीस त्यावेळीं रंगूशेट गुजर नांवाचे मोठे सावकार होते. त्यांना दादांच्या कर्तबगारीबद्दल विश्वास वाटूं लागला. त्यांनीं दादांना बारामती जवळच मळद येथील दहा एकर ज़मीन खंडानें दिली. एकरीं पन्नास रुपये खंड ठरला. लागणारें भांडवल मात्र रंगूशेटनीं वारंवार पुरवायचें. याच वेळीं बारामतीस गणूकाका दाते नांवाचे एक मोठे सुशिक्षित व अनुभवी शेतकरी होते. दादा त्यांचा मधूनमधून सल्ला घेत. त्यांना एकरीं ५० रु. खंड पसंत नव्हता. परंतु दादांनीं धाडसानें ती गोष्ट मान्य करून टाकली. अविश्रांत परिश्रम सुरू झाले. त्या दहा एकरांत प्रथम त्यांनीं ऊंस लावला. शेतीचीं कामें जरी मोलमजुरीनें होत असलीं, तरी प्रत्येक कामांत दादा स्वतः बारकाईनें लक्ष देत. त्यांचें स्वतःचें जीवन अगदीं शेतकऱ्यासारखें होतें. ते सकाळीं सूर्योदयानंतर व सायंकाळीं सूर्यास्तापूर्वीं घरीं दिसत नसत. दुपारीं बारानंतर शेतावर चटणी-भाकरी खातांना त्यांना अनेकांनीं पाहिलें असेल.

पहिल्याच वर्षीं दादांना सर्व खर्च जाऊन उंसांत एकरीं २०० रुपये फायदा झाला. गणूकाकांना आश्चर्य वाटलें. चिकाटी, प्रयत्नांची पराकाष्ठा आणि हिशेबी काटेकोरपणा हे गुण ज्या शेतकऱ्याच्या अंगीं असतील, तोच शेतींत यशस्वी व्हायचा असा दादांचा विश्वास होता. शेती म्हणजे शेतकऱ्याचें जीवन. तिला डोळ्यांत तेल घालून

काळजापलीकडे जपलें पाहिजे. शेतकऱ्यानें अद्ययावत् पद्धति व साधनें यांचा अभ्यास करून तीं उपयोगांत आणलीं पाहिजेत, असें ते वारंवार म्हणत. शेतीचें काम संपवून ते घरीं आले कीं, त्यांचे हिशेब आणि वाचन सुरू होई. कोणत्या पुस्तकांत कोणती पद्धति सांगितली आहे. तींत कोणते गुणदोष आहेत. आपल्या देशांत कोणत्या पद्धति शक्य आणि फायदेशीर होतील. उत्कृष्ट साधनें कोणतीं, शेतकऱ्यास कोणते जोडधंदे अधिक उपयुक्त ठरतील यांचेंच ते सतत चिंतन करीत.

**उंसाच्या शेतींत नवे प्रयोग**

इ० स० १९१९ मधें महाराष्ट्रांत दुष्काळ पडला. भाटघरचा तलाव कोरडा झाला. सरकारनें उंसाच्या लागवडीला बंदी घातली. युद्धोत्तर महागाईनें आधींच संत्रस्त झालेल्या शेतकऱ्यांना मोठाच धक्का बसला. आतां करायचें काय ?

संक्रांत ते अक्षय्यतृतीया या काळांत पूर्वीं सवडीनें उंसाची लावणी होत असे. या प्रकारच्या लावणींत उंसाच्या वाढीस ८ ते १० महिनेच मिळत. त्यानंतर उंसाची वाढ खुंटून त्यास तुरे येत. त्यामुळें पीक कमी भरे. बारामती भागांत हीच पद्धति चालू होती. त्यामुळें एप्रिल-मेपर्यंत ऊंस चांगला मोठा होऊन भर उन्हाळ्यांत जर त्यास पाटाचें पाणी मिळालें नाहीं तर मग त्याचें पीक आटोपलेंच. यांतून मार्ग काढण्यासाठीं म्हणून दादांनीं आडसाली पद्धति बारामती भागांत सुरू केली.

उंसाची लावणी केल्यावर त्याला जोरदार फूट येण्यास ४० अंश सेंटिग्रेड उष्णतामान व हवेंत कांहीं प्रमाणांत ओलसरपणा (आर्द्रता) हीं आवश्यक असतात. दादांना हें माहीत होतें. आपल्याकडे अशी परिस्थिति जून-जुलैमधें असते. तेव्हां या वेळीं जर ऊंस लावला, तर तो चांगला येईल आणि उन्हाळ्यांत पाणी कोठून द्यायचें, ही विवंचना टळेल, असें त्यांना वाटलें. याशिवाय कडक उन्हाळा व कडक हिंवाळा हे दोन्ही लावणीस बाधक असल्यानें तेहि आपो-आपच टळतील. आपल्याकडे जूनमधेंच पाऊस सुरू होतो. शिवाय पावसाचे चार महिने उंसाला फारसें पाणी द्यावें लागणार नाहीं. त्याच्या पुढील चार महिन्यांत थंडी अस-ल्यानें पाणी कमी लागेल. फक्त उन्हाळ्यांत पाण्याची काळजी घेतली कीं झालें. याशिवाय डिसेंबरमधें लाव-लेल्या उंसाची वाढ एक वर्ष पूर्ण होण्यापूर्वींच होत अस-ल्यानें तो लवकर काढावा लागतो. अर्थात् त्याचें पीक कमी येतें. किंमतहि कमी मिळते. पण जूननंतर लावलेल्या उंसाची वाढ होण्यास दीड वर्ष मिळून पीकहि अधिक मिळतें. या आडसाली पद्धतींत जुन्या पद्धतीप्रमाणें फक्त उन्हाळ्यांतच पाण्याची विवंचना करावी लागते, दोन पावसाळे व दोन हिंवाळे यांचा उपयोग करून घेतां येतो. त्यामुळें पीक वाढतें. शिवाय इतरांच्या आधीं हिंवाळ्यांतच तो तोडतां येऊन त्याला भावहि चांगला येतो. दादांनीं १९१९-२० सालीं या आडसाली पद्धतीनें दहा एकर ऊंस केला. त्याला ३५००० रु. किंमत येऊन खर्च वजा जातां

२३००० रु. निव्वळ फायदा झाला. पुढील वर्षी त्यांनीं ५५ एकर उंसाची लागवड केली. लवकरच ही आडसाली पद्धति अनेक शेतकऱ्यांनीं उचलली. आणि तीपासून शेतकऱ्यांची आर्थिक स्थिति सुधारूं लागली.

**प्रयोगशीलता, योजकता आणि परिश्रम**

जीवनांत फारशा गरजा न वाढवितां अत्यंत साधे-पणानें व काटकसरीनें रहायचें. कृषिशास्त्राचा सतत अभ्यास करायचा. नव्या नव्या पद्धति आत्मसात् करायच्या. आपल्याला त्यांपैकीं ज्या उपयोगी पडतील त्यांचा विचार करून त्या निवडायच्या. नंतर त्या बाबतींत प्रयोग करून ज्या पद्धति आर्थिक दृष्टचा फायदेशीर ठरतील त्यांचा अवलंब करायचा. शेतीचें एकरीं उत्पन्न वाढवायचें आणि अधिक धान्य उत्पन्न करून आपलें देशाविषयींचें ऋण फेडायचें. हा दादांच्या जीवनाचा मंत्र होता. तो त्यांनीं अखेरपर्यंत निष्ठापूर्वक पाळला. एखादी गोष्ट मनांत आली कीं, दादांचें मन तिच्या विचारानें पूर्ण भारावून जाई. निरनिराळ्या ठिकाणांहून त्याविषयीं ते माहिती मिळवीत. त्यावर विचार करीत. आणि मग सर्वस्व पणाला लावून ती मूर्त करण्यास रात्रंदिवस तन, मन, धन वेंचीत.

१९२० नंतर दादांना शेतींत जो फायदा झाला, तो सर्व त्यांनीं शेतीच्या कारणीं लावला. पडीक जमिनी घ्यायच्या, त्यांना तालीतुंबा घालायचा, खतपाण्याची व्यवस्था करायची आणि अशा रीतीनें त्या जमिनी कारणीं लावून त्यांतून जास्तींत जास्त पीक काढायचें.

१९२८ सालीं दादांनीं बारामतीपासून थोड्या अंतरावर भीमा नदीच्या कांठीं असलेल्या राजेगांवमधील ३०० एकर पडीक जमीन फॉरेस्ट खात्याकडून १२००० रुपये देऊन खरेदी केली. असली जमीन खरेदी केल्याबद्दल अनेकांनीं दादांना दोष दिले असतील. परंतु ओबडधोबड दगडांतून सुंदर शिल्प निर्माण करणाऱ्या कलावंताची किमया दादांच्या हातांत होती. दादांचे हात लागले कीं, वाटेल तसल्या निकृष्ट जमिनींतून माणिक-मोत्याचें पीक निघे. दादांनीं या ३०० एकर पड जमिनीवर कित्येक वर्षें अहोरात्र परिश्रम केले. हजारों रुपये यावर खर्च केले. आणि त्या जमिनीचें नंदनवन बनविलें. भावी काळाचीं पावलें ओळखून जेव्हां त्यांनीं १९४४ सालीं ती जमीन विकली तेव्हां तिला २॥। लाख किंमत आली.

ही सर्व जमीन नदीकांठीं असल्यानें तींतील पुष्कळसा भाग वाहून गेलेला होता. त्यामुळें तिला ताली घालून तीवर ठिकठिकाणीं भर घालणें जरूर होतें. नदीवर ठिकठिकाणीं पंप बसवायला पाहिजे होते. जेथें पाणी चढविणें शक्य नव्हतें अशा ठिकाणीं विहिरी काढून पाण्याची सोय करायला हवी होती. शिवाय जमिनीचा एकूण कस वाढविण्यासाठीं विविध खतांचा उपयोग करणेंहि जरूर होतें. इतक्या सर्व गोष्टी विचारपूर्वक हिशेबी पद्धतीनें करण्यास केवढी योजकता, केवढे परिश्रम आणि केवढा पैसा लागला असेल याची कल्पना सामान्य माणसाला तरी येणें कठीण आहे.

परंतु इतके सर्व परिश्रम झाल्यावर याच जमिनीवर संत्र्या-मोसंब्यांच्या रसरशीत बागा, टपोऱ्या द्राक्षांचे मळे, १५०-१५० केळांचे घड देणाऱ्या केळी, सर्व प्रकारचा भाजीपाला आणि मोत्यासारखे दाणे असलेलीं गहूं-जोंधळ्याचीं शेतें पाहणारास आपण नंदनवनांत असल्याचा भास झाला तर त्यांत नवल तें कसलें ? हें सर्व पाहतांना दादांची कल्पक योजकता व परिश्रम हींच येथें मूर्त झालीं आहेत, असा क्षणभर भास होई.

शेतीला पाणी अपुरें पडूं लागलें, म्हणून सरकारनें याच वेळीं भीमा नदीवर भांबोर येथें पंप बसवून 'लिफ्ट इरिगेशन' पद्धति सुरू केली. पण तीमधें कॅनॉलच्या पाण्याच्या खर्चाच्या तिप्पट खर्च एकरीं येऊं लागला. त्यामुळें हें पाणी शेतीस घेणें शेतकऱ्यांना महाग वाटूं लागलें. लवकरच ही पंप-योजना बंद पडली. परंतु दादांनीं नीरेकांठीं निबूत येथें ३० एकर जमीन खंडानें घेऊन तींत पंप पद्धतीचा अवलंब केला. आणि कॅनॉलच्या पाण्यापेक्षां हें पाणी फारसें महाग पडत नाहीं, हें त्यांनीं प्रत्यक्ष दाखवून दिलें. गेलीं तीस वर्षें ही लिफ्ट इरिगेशनची पद्धति यशस्वी रीतीनें चालूं आहे. आज सरकारनें अनेक ठिकाणीं लिफ्ट इरिगेशनची पद्धति सुरू केली आहे. पडीक जमिनी लागवडीस आणल्या आहेत. परंतु चाळीस वर्षांपूर्वीं दादांना या दोन्ही गोष्टींचें महत्त्व पटलें होतें आणि त्यांनीं त्या यशस्वीहि करून दाखविल्या होत्या. कारण दादा जातिवंत शेतकरी होते.

## उंसाच्या उत्पादनांत उच्चांक

इ. स. १९३१ ते ३३ हा काळ उंसाच्या धंद्याच्या दृष्टीनें अत्यंत मंदीचा होता. उत्तर भारतांतील शेतकरी वर्षभर काम मिळावें म्हणून ऊंस लावूं लागले त्यामुळें उंसाचे भाव घसरले. याच वेळीं जावांतून भारतांत अत्यंत स्वस्त दराची साखर व गूळ हीं येऊं लागलीं. त्यामुळें शेतकऱ्यांना कॅनॉलचें पाणीहि परवडेना. तेव्हां शेतकऱ्यांनीं कॅनॉलचें पाणी घेणें बंद केलें. चांगले चांगले सधन शेतकरी सुद्धां मेटाकुटीला आले. उत्तम शेतकरी असूनहि दादांची तीच स्थिति झाली. सर्व शेती विकली असती तर ७०००० रु. लोकांचें देणें जेमतेम भागलें असतें. पण दादा डगमगले नाहींत.

त्यांचा स्वतःच्या कर्तबगारीवर पूर्ण विश्वास होता. या मंदीच्या काळांत शेतीच्या जोडीला त्यांचा म्हशींची खरेदी-विक्री करण्याचा व्यवसाय सुरू होता. मांजरी फार्म-मधून भाकड म्हशी आणून त्या राजेगांव व निंबूत येथें पोसायच्या व विण्यापूर्वीं जास्तींत जास्त किमतींत विकायच्या, असा त्यांचा उपक्रम होता. एप्रिल ते जुलैपर्यंत उन्हाळ्यानें दुभत्या म्हशींच्या किमती दीडपट दुप्पट होतात. तेव्हां आणलेल्या म्हशी त्याच काळांत वितील इकडे कटाक्षानें लक्ष दिलें जाई. तशी योजना केली जाई. इ. स. १९४३-४४ ला दादांच्याजवळ अशा १८३ म्हशी होत्या.

मंदीची ही लाट थोपविण्यासाठीं सरकारनें टॅरिफ़ बोर्डाकडून उंसाच्या धंद्याची चौकशी सुरू केली. त्या बोर्डानें "जावाच्या साखरेवर आणि गुळावर कर बसवावा आणि

सहकारी तत्त्वावर साखर-कारखाने काढावेत," अशी शिफारस केली. साखर कारखाने कोठें काढायचे त्याच्या जागाहि निश्चित केल्या. आणि उद्योगपतींना साखर-कारखाने काढण्यास उत्तेजन देण्याचें ठरविलें.

इ. स. १९३० पर्यंत दादांची बारामती भागांत एक नाणावलेला यशस्वी शेतकरी म्हणून ख्याति झाली होती. याच वेळीं शेठ वालचंद हिराचंद यांनीं साखर-कारखाना काढला. तेव्हां शेती विभागावर सल्लागार व पर्यवेक्षक म्हणून त्यांनीं दादांची नेमणूक केली. दादांनीं ती आनंदानें मान्य केली व मोठ्या निष्ठेनें तें काम केलें. याच वेळीं उंसावर प्रयोग चालू असतां उंसाच्या जास्तींत जास्त उत्पादनाचा प्रश्न निघाला. तेव्हां दादांनीं एकरीं १०० टन उंसाचें पीक काढण्याचें आव्हान स्वीकारलें. त्या वेळचे शेती खात्याचे डायरेक्टर सर जोसेफ के यांनीं ही गोष्ट अशक्यप्राय म्हणून सांगितली. जर योगायोगानें ही गोष्ट शक्य झालीच तर त्या जमिनींतील कस नाहींसा होऊन पुढें ती शेतीस निरुपयोगी ठरेल, असेंहि त्यांनीं बजावलें.

दादांनीं वर्षभर परिश्रमपूर्वक प्रयत्न करून एकरीं १०५ टन ऊंस काढून दाखविला आणि उंसाच्या उत्पादनाचा नवा उच्चांक प्रस्थापित केला. पुढील वर्षी त्याच खोड-व्यांतून नेहमींच्या उत्पन्नापेक्षां अधिक उत्पन्न काढून जमिनीचा कस निघून जात नाहीं हेंहि सिद्ध करून दाखविलें. दादांच्या या विक्रमानें त्यांचा लौकिक भारतभर पसरला. इतर शेतकऱ्यांनीं पुढें यावें आणि उंसाच्या उत्पादनांत लक्ष घालून तें सुधारावें, यासाठीं त्यांनीं एकरी १०० टनांपेक्षां

अधिक ऊंस निर्माण करणारास, दादांच्यावरील विश्वासानें, वालचंद शेटजींनीं डेक्कन चेंबर ऑफ कॉमर्सच्या वतीनें १००० रु. चें बक्षिस लावलें. तेव्हां वालचंदनगरलाच एकानें एकरीं १२२ टनाचा नवा उच्चांक निर्माण करून दाखविला. आपल्यापेक्षां सवाई शेतकरी निर्माण झाला, याचा दादांना आनंदच झाला. परक्याचा उत्कर्ष सहन होणारीं माणसें जगांत फारच थोडीं असतात. दादा अशा दुर्मिळांपैकीं एक होते.

उंसाच्या उत्पादनाबाबत प्रयोग करतांना दादांनीं मांजरी व कोइमतूर येथील फार्ममधून निरनिराळीं बेणीं आणलीं होतीं. बेलापूरच्या श्री. महाजन यांच्याकडे पी. ओ. जे. २८८३ उंसाचें एक बेणें होतें. परंतु तें देण्यास महाजन तयार नव्हते. तेव्हां दादांनीं खाण्यासाठीं म्हणून कांहीं ऊंस त्यांच्याकडून मागून घेतले व त्यांची काळजीपूर्वक लावणी केली. कांहीं वर्षांनीं तेंच बेणें २८ एकरांत तयार झालें. उंसाचा गूळ केला असतां जी ६०० रु. एकरीं किंमत आली असती, त्याच उंसाची किंमत तो ऊंस बेणें म्हणून वालचंदनगर येथील साखर कारखान्यानें विकत घेतल्यानें एकरीं ५५०० रु. आली. इतर शेतकऱ्यांजवळ अशा प्रकारचें बेणें नसल्यामुळें फक्त दादांनाच त्याचा फायदा मिळाला. त्यामुळें मंदीच्या काळांत झालेल्या नुकसानीची भरपाई झाली. दादांना पी. ओ. जे. २८८३ च्या उंसानें इतर शेतकऱ्यांपेक्षां अधिक हात दिला. त्यांची आर्थिक स्थिति एकदम सुधारली. आजपर्यंत केलेल्या श्रमाचें फळ मिळूं लागलें. दादांची ललाटरेषा एकदम पालटली !

## इतर क्षेत्रांतहि कामगिरी

इ. स. १९३७-३८ मधें फलटण संस्थानांत निघालेल्या साखर-कारखान्यासाठीं घ्यावयाच्या जमिनींच्या खंडाबाबत शेतकरी व कारखाना यांच्यामध्यें तडजोड करण्यासाठीं श्रीमंत मालोजीराव नाईक निंबाळकर यांनीं दादांना सल्ला-गार मंडळावर नेमलें. त्या वेळीं त्यांनीं श्री. बाबासाहेब कामथ यांच्याबरोबर त्या समितींत काम करून शेतकरी व कारखाना यांच्यामध्यें तडजोड घडवून आणली.

नंतर सरकारनें सर विश्वेश्वर अय्या यांच्या अध्यक्षते-खालीं 'इरिगेशन इन्क्वॉयरी कमिटी' नेमली. सरकारनें दादांची या समितींत सभासद म्हणून नेमणूक केली. त्या वेळीं दादांनीं या समितीला 'इरिगेशन' मधील शेतकऱ्यांच्या अडचणी समजावून दिल्या. सरकारी नियमा-प्रमाणें बांध घालण्याची सक्ती केल्यानें शेतीचें नुकसान कसें होतें, हें दाखवून दिलें व सरकारला बांध—ओरंब्याचा नियम रद्द करावयास लावलें. यापूर्वी त्यांनीं डेव्हलपमेंट ॲग्रिकल्चरल असोसिएशनचे अध्यक्ष असतांना उंसाच्या लागवडीविषयीं सरकारनें चालू केलेली ब्लॉक-पद्धति सर-कारला बंद करायला लावून अनेक शेतकऱ्यांचा फायदा करून दिला. इ. स. १९४४-४७ पर्यंत दादांची इम्पीरिअल कौन्सिल ऑफ सेंट्रल शुगरकेन कमिटीचे सभासद म्हणून सरकारनें नेमणूक केली. याहि समितींत त्यांनीं शेतकऱ्यांच्या हिताचीं अनेक कामें केलीं.

हे सर्व उद्योग दादा घरची शेती सांभाळून करीत होते, हें लक्षांत घेतलें पाहिजे. दुसऱ्या महायुद्धांत त्यांनीं पुण्याच्या लष्कराला भाजीपाला पुरविण्याचें कंत्राट घेतलें होतें. त्यांत त्यांनीं कधींहि खंड पडूं दिला नाहीं. मराठी सातवी व इंग्रजी तिसरीपर्यंत जेमतेम शिक्षण घेणारा मनुष्य दीर्घोद्योग, अभ्यास व आत्मविश्वास यांच्या जोरावर काय करूं शकतो, याचें मोठें उदाहरण म्हणजे दादासाहेब शेंबेकर होत. या सर्व गोष्टी पाहिल्या म्हणजे शेती व शेतकरी यांचें हित पाहण्यासाठींच त्यांचा जणुं जन्म झालेला होता असें वाटतें.

**द्राक्षांच्या लागवडींतील नवे प्रयोग**

उंसाच्या पिकाच्या बाबतींत दादांनीं ज्याप्रमाणें सुधारणा करून नवा उच्चांक प्रस्थापित केला, त्याप्रमाणें त्यांनीं द्राक्षाच्या पिकाच्या बाबतींतहि तसाच उच्चांक निर्माण केला. द्राक्षें हीं फक्त नाशिक जिल्ह्यांतच व्हायचीं, अशी पूर्वी लोकांची ठाम समजूत होती. परंतु दादांनीं द्राक्षाचें पीक बारामती भागांत पहिल्यानें काढायला सुरुवात करून लोकांना दाखवून दिलें कीं, नाशिकइतकेंच द्राक्षाचें पीक बारामती भागांत चांगलें येतें. द्राक्षाच्या लागवडीबाबत पुष्कळ वाचन व मनन करून त्याच्या लागवडींत त्यांनीं पुष्कळ सुधारणा केल्या. द्राक्षाचें एकरीं उत्पादन वाढविलें. त्याची प्रत सुधारली. एकरीं १३५ पल्ले द्राक्षाचें उत्पन्न काढून दाखवून त्याचाहि एक नवा उच्चांक निर्माण केला.

बारामती भागांतच काय पण सबंध महाराष्ट्रांत द्राक्षाच्या पिकाच्या बाबतींत दादांचा हात धरणारा दुसरा कोणताहि शेतकरी नव्हता. त्यांनीं द्राक्षांच्या अनेक जाति लावून पाहिल्या व या भागांत कोणती जात अधिकाधिक पीक देऊं शकेल, हें निश्चित केलें.

नाशिक जिल्ह्यांत पावसाचें मान जेथें कमी कमी होत जातें, अशाच भागांत द्राक्षांचें पीक चांगलें येतें, ही गोष्ट दादांच्या लक्षांत आली. आपल्याकडेहि पावसाचें मान कमी आहे. मग येथें द्राक्षें कां होऊं नयेत, असें त्यांच्या मनानें घेतलें. लगेच त्या उद्योगाला ते लागले. प्रयोगामागून प्रयोग होऊं लागले. द्राक्षांच्या जाति जमा होऊं लागल्या. यांतूनच त्यांनीं द्राक्षांच्या लावणीची एक नवी पद्धति काढली. ती सर्वोत्तम ठरली. सर्व जातींत भोकरी ही जात या भागांत जास्त पीक देऊं शकते, हेंहि त्यांनीं सप्रमाण सिद्ध करून दाखविलें. कॅलिफोर्नियासारख्या द्राक्षांच्या माहेरघरीं अद्ययावत् साधनसामग्री व अनुकूल हवामान असूनसुद्धां तेथें एकरीं १४४ पल्ले द्राक्षें पिकतात. परंतु दादांनीं द्राक्षाची भूमि नसणाऱ्या ठिकाणीं एकरीं १३५ पल्ले द्राक्षें काढून दाखविलीं. यावरून त्यांच्या शेतीमधल्या कसबाची कल्पना आपणांस येईल. कॅलिफोर्नियांत सतत सहा वर्षें प्रयोग केल्यावर एकदांच द्राक्षाच्या उत्पादनाचा आंकडा एकरीं १८४ पल्ल्यावर जाऊं शकला. परंतु इ. स. १९५५ सालीं बारामतीस शंकरराव दाते

यांनीं एकरीं २०५ पल्लें द्राक्षें काढून जागतिक उच्चांक मोडला. क्रॉफर्ड मार्केटमधें येणाऱ्या द्राक्षांच्या सर्व जातींत दादांचा माल ८० टक्के असे. त्याला इतरांपेक्षां किमतहि अधिक येई.

दादासाहेबांनीं द्राक्षाची लावणी करण्याची जी नवी पद्धति रूढ केली, तींत खड्डयांत एकदम सात-आठ 'कटिंग्ज' (कांडीं) लावतात. तीं चांगलीं फुटलीं म्हणजे त्यांतील जोरदार एक-दोन ठेवून बाकीचीं काढून टाकतात. पूर्वीं अशीं कांडीं प्रथम कुंडयांतून लावीत. या पद्धतीमधें एका ठिकाणाहून दुसऱ्या ठिकाणीं कांडीं लावतांना त्यांचीं मुळें दुखावतात व जोर कमी होतो. निरनिराळ्या कांडयांची वाढ कमीअधिक होते. त्याचा परिणाम पुढें पीक मागेंपुढें होण्यांत होतो. शिवाय एका ठिकाणचें कटिंग काढून दुसरीकडे लावण्यास मजुरी आणि पैसेहि अधिक लागतात. शिवाय प्रत्येक खड्डयांत दोनदोन रोपें झाल्यानें एकरीं वेलांची संख्या पूर्वींच्या दुप्पट म्हणजे २००० ते २५०० होते. त्यामुळें पहिलीं ३।४ वर्षें दुप्पट पीक येतें.

वेलांना मांडव करण्याच्या पद्धतींतहि दादांनीं बदल केला. या पद्धतींत २० ते २५ फुटांवर सागवानी वासे पुरतात व त्यावर तारा ठोकून वेल पसरण्यास भरपूर जागा मिळते. वेलांच्या पानांना भरपूर सूर्यप्रकाश व हवा हीं लाभतात. पर्यायानें वेलांची वाढ जोरदार होऊन पुढें

ते मोठेमोठे भरपूर घड देतात. त्यामुळें उत्पन्न वाढतें. ही तारेच्या मांडवाची पद्धति थोडी महाग असली, तरी तीमुळें पीक दुप्पट तिप्पट लाभून केव्हांच सर्व खर्च वसूल होतो. द्राक्षांच्या लावणीची ही नवी पद्धत आतां सर्वमान्य होऊन रूढ झालेली आहे. लोकांना तिचें महत्व पूर्णपणें पटलेलें आहे. या पद्धतींत खत देण्याच्या बाबतींतहि थोडा बदल केलेला आहे. बारामती भागांत द्राक्षासारखें पैसा देणारें पीक यशस्वी करण्याचें सारें श्रेय दादांना आहे. या पिकानें अनेक शेतकऱ्यांना आर्थिक हात दिला आहे. दादांचें हें ऋण बारामती भागांतील प्रत्येक शेतकऱ्याला आदरानें मान्य करावें लागेल.

## कृतकार्याचा गौरव

दुसऱ्या महायुद्धांत जेव्हां दादांनीं पुण्याच्या लष्करी तळाला भाजीपाला पुरविण्याचें कंत्राट घेतलें, तेव्हां त्यांनीं निंबूत, राजेगांव वगैरे ठिकाणीं ऊंस व द्राक्षें या दोन मुख्य पिकांबरोबर भाजीपाला, संत्रीं, मोसंबीं, पोपई, केळीं, टोमॅटो वगैरे सर्व तऱ्हेचीं पिकें मोठ्या प्रमाणावर चांगल्या प्रकारें काढलीं. महागाईच्या काळांत त्यापासून त्यांना पैसाहि भरपूर मिळाला. कोणत्या वेळीं कोठें काय लावावें म्हणजे त्यापासून हमखास भरपूर पीक मिळून पैसाहि अधिक मिळेल, हें दादांना चांगलें समजे–जणुं कांहीं त्यांची मनोदेवताच त्यांना तशी आंतून प्रेरणा देत असे.

इ. स. १९४८ ते ५४ या काळांत दादांना पोपईनें चांगलाच पैसा मिळवून दिला. याच काळांत साखर व गूळ हीं महाग झालीं. परंतु त्या महागाईच्या मानानें शेतकऱ्यांना जसा फायदा व्हावा तसा होईना. साखर-कारखाने त्या मानानें कमी किंमतींत ऊंस घेत. म्हणून सहकारी पद्धतीवर एखादा साखर-कारखाना काढण्याचा विचार श्रीमंत नाईक निंबाळकरांच्या प्रेरणेनें दादा करूं लागले. हळूहळू तो विचार मूर्त करण्याच्या मागें ते लागले.

आतांपर्यंत केलेल्या शेतीविषयक कार्याचा, दादांना निरनिराळ्या समित्यांवर नेमून सरकारनें गौरव केला. त्याशिवाय त्यांना 'रावबहादुर' हा मानाचा किताबहि सरकारनें दिला. शेतीच्या क्षेत्रांत त्यांनीं केलेल्या कामगिरीचें त्यांच्या समव्यवसायी बंधूंनींहि कौतुक केलें. १९५३ मध्यें भरलेल्या बागाईतदार परिषदेचें आणि १९५४ मध्यें पुण्यास भरलेल्या जमीनमालकांच्या परिषदेचें अध्यक्षपद लोकांनीं त्यांना दिलें. यांशिवाय अनेक संस्थांचे आणि समित्यांचे ते अध्यक्ष होते. किर्लोस्कर, ओगले, साठे बंधु यांच्या कारखान्यांचे ते डायरेक्टर होते. महत्त्वाकांक्षा, चिकाटी दीर्घ परिश्रम, अभ्यास वगैरे अनेक गुणांमुळें जेमतेम इंग्रजी २।३ इयत्ता किंवा मराठी सातवीपर्यंत शिक्षण घेतलेला मनुष्य किती मोठ्या पदवीला जाऊन पोहोंचतो, याचें दादासाहेब शेंबेकर म्हणजे मूर्तिमंत उदाहरणच होय. अशी कर्तबगारी फारच थोड्यांच्या नशिबीं असते.

## युरोप-अमेरिकेंतून ज्ञानार्जन

इ. स. १९४९ मधें दादांनीं युरोप-अमेरिकेंतील देशांचा, शेतीचें निरीक्षण करण्यासाठीं प्रवास केला. युरोपांत ते प्रामुख्यानें फ्रान्स, इटली, जर्मनी येथें गेले. तेथें त्यांनीं द्राक्षांच्या मळ्यांतून वेलांची लावणी व कापणी कशी करतात हें पाहिलें. द्राक्षांच्या विविध जातींची माहिती घेतली. त्यांच्या एकरीं उत्पादनाचे आंकडे मिळविले. फळबागा पहिल्या. आधुनिक कृषिपद्धतींचा अभ्यास केला. डेन्मार्कमधील दुग्धव्यवसाय पाहिला. दुधाळ जनावरांची निवड, निपज व पोषण यांची माहिती घेतली. नंतर अमेरिकेंतील संयुक्त संस्थानांत जाऊन तेथील यांत्रिक पद्धतीनें चाललेली विस्तृत शेती अवलोकिली. कॅलिफोर्नियामधील द्राक्षांचे मळे पाहिले.

भारतांतील शेतकऱ्यांची आर्थिक स्थिति व शेती यांबद्दल बोलतांना ते म्हणत, "आपल्या देशांतील शेतकऱ्याची आर्थिक स्थिति जर खरोखरीच सुधारावयाची असेल तर अद्यावत् पद्धति व यंत्रसामुग्री यांचा उपयोग केला पाहिजे. त्यामुळें शेतीला जोडून आणखी एखादा धंदा करण्यास त्याला वेळ मिळेल. आज त्याची सर्व शक्ति निसर्गाशीं झगडण्यांत शेतींत खर्च होते; आणि कोंबड्या पाळणें, दुधाचा व्यवसाय करणें किंवा वस्त्रनिर्मीति करणें असे उद्योग त्याला करतां येणें अशक्य होतें. असले उद्योग करण्यास त्याला शक्ति शिल्लक उरली पाहिजे. त्याला

वेळ मिळाला पाहिजे." कूळकायद्याबद्दलहि त्यांचें म्हणणें असें कीं, "केवळ कुळांना जमिनींचे मालक करून अधिक धान्य पिकविण्याचें इच्छित ध्येय साधणार नाहीं. तर प्रत्येक जमिनींतून इतकें ठराविक धान्य पिकविलें पाहिजे, असा दंडक घातला तरच अधिक धान्य पिकविण्याचें ध्येय साध्य होईल."

**सार्वजनिक आणि व्यक्तिगत**

१९५१ सालीं झालेल्या भारतीय निवडणुकीस दादा उभे राहिले होते. काँग्रेस, हिंदुमहासभा वगैरे पक्षांनीं आपापल्या पक्षामार्फत त्यांना निवडणूक लढविण्याची पुष्कळ गळ घातली. परंतु पक्षाचीं बंधनें व शिस्त हीं शेतकऱ्यांच्या हिताच्या आड येतील, शेतकऱ्यांचीं दुःखें वेशीवर टांगण्याच्या मार्गांत तीं धोंड होतील, याची त्यांना जाणीव होती. म्हणून ते कोणत्याहि पक्षाचे उमेदवार म्हणून उभे राहिले नाहींत; तर एक स्वतंत्र उमेदवार म्हणून ते उभे राहिले. निवडणुकीच्या आपल्या विनंतीपत्रकांत व व्याख्यानांत त्यांनीं आपलीं मतें सडेतोडपणें मांडलीं. नाहींतर काँग्रेसमधें शिरून त्यांना सहज निवडून येतां आलें असतें. पण तो त्यांचा पिंड नव्हता. ते अगदीं निःस्पृह होते. फलटणच्या साखर कारखान्याच्या कामासाठीं ते तेथें एकदांच गेले होते. त्या त्यांच्या कामाचा मोबदला म्हणून श्रीमंत नाईक निंबाळकर यांनीं त्यांना २००० रु. देऊं केले. पण ते घेण्याचें त्यांच्या जिवावर आलें. राजलक्ष्मी लाथाडायची

नाहीं, म्हणूनच त्यांनीं तिचा स्वीकार केला. पण पुढें तींत ५०० रु. भर घालून फलटण येथील वाचनालयास त्या रकमेचीं शेतीविषयक पुस्तकें विकत घेण्यास त्यांनीं ती रक्कम देणगी म्हणून दिली.

दादांचें जीवन जें यशस्वी झालें, त्याचें कारण म्हणजे त्यांच्या अंगीं असणारे गुण. त्यांचें शिक्षण फारसें जरी झालें नव्हतें, तरी त्यांचें मन प्रगल्भ आणि सुसंस्कृत होतें. वाचन, मनन आणि चिंतन यांनीं त्यांनीं आपल्या जीवनांतील प्रत्येक गोष्ट पद्धतशीर केली होती. त्यांत हिशेबीपणाबरोबर उदारपणाहि होता. दुसऱ्याचें मन न जाणतां त्याला लुबाडायचें; त्याचे श्रम फुकट अगर कमींत कमी पैशास घ्यावयाचे; अशी वृत्ति त्यांनीं अगदीं पडत्या काळांत---अत्यंत दारिद्र्यांत सुद्धां ठेवली नव्हती. पुढें तर ती नव्हतीच नव्हती.

निवडणुकीच्या वेळीं ज्यांनीं ज्यांनीं त्यांना मदत केली, त्यांची त्यांची त्यांनीं कोणत्या ना कोणत्या रूपानें परतफेड केली. कोणाचेहि श्रम फुकट घेतले नाहींत. एखाद्याला जर एखादें काम ठरवून अंगावर दिलें आणि प्रत्यक्षांत जर त्याला त्यांत कांहीं फायदा झाला नाहीं, तर ते त्यास आपणहून ठरल्या रकमेपेक्षां अधिक रक्कम देत.

मुळांतच त्यांचा स्वभाव उदार होता. ते स्वतः मात्र अत्यंत साधेपणानें वागत. त्यांचा पोषाख, त्यांचें राहणें, त्यांचें वागणें व त्यांचें खाणेंपिणें सर्व कांहीं अगदीं साधें

असे. परंतु घरीं आलेल्या पाहुण्याच्या बाबतींत मात्र त्यांना साधेपणा किंवा काटकसर खपत नसे. पैसा मिळूं लागल्यावर हिशेबीपणानें व काटकसरीपणानें वागून त्यांनीं एवढी मोठी शेती खरेदी केली. परंतु त्यांनीं त्या पैशाचा स्वतःसाठीं गरजेपलीकडे कोठें फारसा खर्च केला नाहीं.

त्यांनीं आपल्या पत्नीला ठिकठिकाणीं तीर्थयात्रेस पाठविलें; पण त्यांनीं स्वतः कधीं तीर्थयात्रेंत आपला वेळ किंवा पैसा घालविला नाहीं. शेती हीच त्यांची काशी होती, तेंच त्यांचें रामेश्वर होतें ! काळीच्या सेवेंत त्यांना भक्तींतील आनंद आणि समाधान लाभे आणि तीर्थाची मंगल पवित्रता भेटे. परदेशांतून येतांना त्यांनीं अनेकांसाठीं अनेक वस्तु आणल्या परंतु स्वतःकरितां असें कांहींहि आणलें नाहीं. इतकें त्यांचें जीवन साधें होतें. त्यांना स्वतःला शिक्षणाची फार हौस. पण घरच्या गरिबीनें त्यांना तें शक्य झालें नाहीं. परंतु दादांच्याकडे मदतीसाठीं आलेला कोणताहि विद्यार्थी विन्मुख जात नसे. त्यांना गणित विषय फार आवडत असे. त्यामुळें ते नेहमीं गणिताच्या गुणांची चौकशी करीत. गणितांत अधिक गुण मिळविणारा विद्यार्थी त्यांना फार आवडे. मुलांनीं पुष्कळ शिकावें असें त्यांना फार वाटे. घरांतील मुलांत मॅट्रिकला अधिकांत अधिक गुण मिळविणाऱ्यास त्यांनीं एकदां आधीं कबूल केल्याप्रमाणें १००० रुपये बक्षिस दिले होते.

## शेतीशिक्षणासाठीं तळमळ

त्यांनीं शिक्षणकार्यासाठीं व लोकोपयोगी कामासाठीं २॥-३ लाखांच्या देणग्या दिल्या आहेत. पुणें विद्यापीठ जेव्हां अस्तित्वांत नव्हतें, अशा वेळीं ऊंस व गूळ यांवर संशोधन करण्यासाठीं त्यांनीं विद्यापीठास एक लाख रुपये दिले. परदेशीं जाऊन शेतीविषयक शिक्षण घेणारास शिष्यवृत्ति देण्यासाठीं म्हणून त्यांनीं एक लाखाचा ट्रस्ट केला. रयत शिक्षण संस्था, निबूत, मळद, लासूर्णा येथील शाळां-नाहि त्यांनीं मोठमोठ्या देणग्या दिल्या आहेत. बारामती येथें गोरगरिबांसाठीं काढलेल्या एका प्रसूतिगृहासाठीं व शेतीच्या विकासासाठीं शेतकी प्रदर्शन भरविण्यासाठींहि दोन मोठ्या देणग्या दिल्या आहेत.

दिलेला शब्द अक्षरशः पाळण्याच्या बाबतींत दादा अत्यंत दक्ष असत. इ. स. १९४८ सालीं गांधीजींच्या वधानंतर महाराष्ट्रामधें ब्राह्मण-ब्राह्मणेतर वादानें पुन्हां डोकें वर काढलें. अनेक ठिकाणीं जाळपोळ झाली. त्या वेळीं दादांनीं कर्मवीर भाऊराव पाटील यांच्या रयत शिक्षण संस्थेस देणगी देण्याचें ठरविलें होतें. कांहीं रक्कम आधींच दिलेली होती. आणि कांहीं द्यावयाची होती. त्या वेळीं अनेकांनीं भाऊराव पाटलांविषयीं दादांचें मन कलुषित करण्याचा प्रयत्न करून देणगी न देण्याविषयीं सांगितलें. दादांना ती गोष्ट पटली नाहीं. त्यांनीं राहिलेली रक्कम ताबडतोब मुदतीपूर्वींच पाठवून दिली. त्यांना वाटलें, 'न जाणों, या

भोंवतालच्या लोकांमुळें एखादे वेळीं आपलें मन बदलायचेंहि. आपण एकदां दिलेला शब्द मोडतां कामा नये.' कोणालाहि देण्याविषयीं गोष्ट मनांत आली कीं, ताबडतोब ती त्याला देऊन ते मोकळे होत. त्यांनीं आपल्या बहिणीला असाच एकदां भाऊबीजेला ओवाळणी म्हणून बंगला देऊन टाकला. भाऊबीजेला ओवाळणी म्हणून बंगला देणारा भाऊ जगांत क्वचितच सांपडेल !

## सद्वर्तनाला अभ्यासाची जोड

कर्णासारखा उदारपणा हा दादांच्या व्यक्तिमत्त्वामधील एक मोठा विशेष होता. त्याच्या जोडीला प्रेमळपणा व समत्व हे दोन गुण त्यांच्या ठिकाणीं होते. लहान असो, मोठा असो ते सर्वांना सारखीच वागणूक देत. घरांत व शेतांवर अनेक गडीमाणसें असायचीं. पण त्या सर्वांना ते आदरपूर्वक हांका मारीत. एकेरी नांवानें अगर अरेतुरेपणानें ते कोणालाच संबोधत नसत. इतकेंच काय पण नोकरमाणसांना ते स्वतःच्या पंक्तीस जेवावयास बसवीत. त्यांच्या खाण्यापिण्याची, औषधपाण्याची, घरच्या अडीअडचणींची आपुलकीनें चौकशी करीत. स्वयंपाकी वगैरे माणसांना त्यांच्या कामांतून वेळींच मोकळें करण्याकडे त्यांचा कटाक्ष असे. त्यामुळें त्याचेच काय, पण घरांतील प्रत्येकाचे व्यवहार सुटसुटीत होत असत. निवडणुकीच्या एवढ्या धांदलींतहि प्रत्येकाची ते व्यक्तिशः चौकशी करीत

असत. त्यांच्या ड्रायव्हरला दमा होता, तर त्याला वेळच्या वेळीं चहा मिळाला कीं नाहीं इकडे ते जातीनें लक्ष पुरवीत. इतर वेळीं सुद्धां आल्यागेल्या पाहुण्याचें ते स्वतः स्वागत करीत. प्रत्येक गोष्टींत अगदीं त्यांची बारीक-सारीक नजर असे.

कोणत्याच बाबतींत त्यांना आळस कसा तो माहीत नव्हता. त्यांच्या रोजच्या दिनक्रमांत शेवटीं शेवटीं एवढें वय झालें तरी सुद्धां, खंड पडलेला नव्हता. इतकेंच काय पण कोणत्याहि गोष्टीस त्यांना उशीर खपत नसे. पहांटे लवकर उठणें, वाचन करणें, त्यावर टिपणें काढणें, सर्व ठिकाणच्या कामांची पूर्वयोजना करणें, स्नान, जेवण, शेतावर जाणें-येणें सर्व कांहीं यंत्रासारखें वेळेवर व्हायचें. गांवाला जायचें म्हणजे आदल्या दिवशींच रात्रीं त्यांची तयारी पूर्ण व्हायची. ठरल्यावेळीं ते निघाले नाहींत, असें क्वचितच व्हायचें. दीर्घोद्योग आणि निरलसपणा ही दादांच्या जीवनांतील यशाची गुरुकिल्ली होती. या गुणांना त्यांच्या अभ्यासू व महत्वाकांक्षीपणानें जोड दिली. आपण मोठें व्हावें, किर्लोस्कर–साठे–ओगले यांच्याप्रमाणें एखाद्या व्यवसायांत यश मिळवावें, असें त्यांना वाटत होतें. कृषि-व्यवसायांत त्यांनीं तें करूनहि दाखविलें. त्यांचा आत्म-विश्वास मोठा दांडगा असे. स्वतःचे विचार किंवा अनुभव ते आडपडदा न ठेवतां, स्पष्टपणें कोणापुढेंहि बोलत असत. मग ऐकणारा कोणी मोठा अधिकारी असो किंवा मंत्री असो.

गणिताप्रमाणें ज्योतिष हा त्यांचा अत्यंत आवडता विषय होता. शेतीविषयक पुस्तकांबरोबर ते ज्योतिषाचीं पुस्तकेंहि वाचीत. देवावर त्यांची अढळ श्रद्धा होती. त्यामुळें त्यांचा विचार सहसा कधीं विचलित होत नसे. ते एखाद्या स्थितप्रज्ञाप्रमाणें प्रत्येक गोष्ट करीत व निर्णय घेत. त्यामुळें त्यांनीं बांधलेले अंदाज सहसा कधीं चुकत नसत. ते जीं जीं पिकें करीत तीं तीं त्यांना भरपूर किंमत मिळवून देत. आणि अशींच पिकें करण्याची बहुधा त्यांना अंतःप्रेरणा होत असे. त्यांना 'कृषिपंडित' असें लोक म्हणत परंतु त्यांची एकूण तपस्या, मनोवृत्ति व आचरण हीं पाहतां त्यांना 'कृषि-महर्षि' म्हणणेंच अधिक शोभेल.

धरणीला नेहमीं माता म्हणतात, कारण तिचें हृदय उदार आणि प्रेमळ असतें. आपल्या मुलांना ती अनंत हस्तांनीं धान्य देऊन भरवीत असते. तिच्या वात्सल्ययुक्त अंतःकरणांत कोणताहि भेद-भाव नसतो. अशा या काळ्या आईची सेवा करणारा शेतकरीहि मनानें तसाच उदार व प्रेमळ असतो. त्याचें काळीज सुपाएवढें असतें. दादा तर हाडाचे शेतकरी. उदारपणाच्या जोडीला कनवाळूपणाहि त्यांच्या अंगीं होता. अनेक गरिबांचे संसार उभे करण्यास त्यांनीं हातभार लावले होते. त्यांच्या कनवाळूपणाची एक सांगण्यासारखी गोष्ट आहे.

एकदां दादांच्या शेतांतील ऊंस चोरीला जाऊं लागला. राखणदारांनीं बराच प्रयत्न केला, पण त्यांना चोर कांहीं

सांपडेना. दादांना तरी हें कसें कळवायचें ? म्हणून राखणदार गप्प राहिले. पण एके दिवशीं शेतावर गेल्यावर तें दादांच्या लक्षांत आलें. त्यांनीं राखणदारांना विचारलें, "ऊंस चोरीस जातो वाटतं ?" राखणदारांना कांहींच सांगतां येईना. त्यांनीं खालीं माना घातल्या. तेव्हां स्वतः दादांनींच त्याचा तलास लावायचें ठरविलें.

लवकरच एक चोर सांपडला. तो होता एक वृद्ध धनगर. दादांच्या समोर येतांच तो खालीं मान घालून रडूं लागला. दादांनीं त्याला सर्व कांहीं प्रेमळपणें विचारून घेतलें. तो म्हणाला, "दादासाहेब, काय सांगूं मी तुम्हांला ? मी हा असा थकलेला. शक्तीचीं कामं माझ्यानं होत नाहींत. आणि मला झेंपेल असं कामहि मिळत नाहीं. घरीं आहेत चार कच्चींबच्चीं खाणार. त्यांत मेलेल्या बहिणीचा प्रपंच पडलाय् गळ्यांत ! काय करायचं ? उपासमार होते म्हणून ऊंस चोरले व विकले." धनगराची ती सारी कर्म-कथा त्यांनीं ऐकून घेतली. त्यांचें दयार्द्र मन विरघळलें.

त्यांनीं क्षणभर विचार केला आणि मग शांतपणें ते म्हणाले, "हें बघा म्हातारबाबा, झालें तें झालें. तें सारें विसरून जा. मी तुम्हांला काम देतों म्हणजे तुमचा प्रपंच व्यवस्थित चालेल. उद्यांपासून तुम्हीच शेताची राखण करा म्हणजे झालें." तो वृद्ध धनगर अगदीं ओशाळून गेला. त्याच्यानें बोलवेना. त्यानें फक्त दादांचे पाय धरले. त्याला

जें कांहीं व्यक्त करायचें होतें, तें तें व्यक्त झालें. इतरांनीं मात्र "चोराच्या हातीं तिजोरीच्या किल्ल्या" दिल्याबद्दल दादांना नांवें ठेवलीं असतील.

## आदर्श भारतीय शेतकरी

दादांचें सारें आयुष्य शेती करण्यांत गेलें. त्यांनीं शेतीच्या अनेक प्रश्नांचा सांगोपांग अभ्यास केला. सरकार-दरबारीं भांडून शेतकऱ्यांच्या अडचणी दूर करण्याचा प्रयत्न केला. पुष्कळ बाबतींत त्यांना यशहि आलें. शेतकऱ्यांच्या उंसाला चांगली किंमत येऊन त्यांचा फायदा व्हावा म्हणून बारामती भागांत एक सहकारी तत्त्वावर साखर-कारखाना काढण्याच्या उद्योगाला ते शेवटीं शेवटीं लागले होते. परंतु त्यांचें काम पुरें होण्यापूर्वींच काळानें त्यांना अकल्पितपणें जगांतून ओढून नेलें ! त्यांच्या मृत्यूनें एक आदर्श शेतकरी नाहींसा झाला. शेतकऱ्यांचा कैवारी मार्गदर्शक लोप पावला. गोरगरिबांचा व विद्यार्थ्यांचा मोठा आधार तुटला. मूर्तिमंत महत्त्वाकांक्षा व साकार उद्योगशीलता हीं मावळलीं.

त्यांनीं आरंभिलेल्या मालेगांव सहकारी साखर-कारखान्याचें काम आतां पूर्ण झालें आहे. आपल्या कर्तबगार मुलाच्या नेतृत्वाखालीं चाललेला हा साखर कारखाना पाहून दादांच्या आत्म्याला निश्चितपणें स्वर्गांत आनंद होत असेल. त्यांच्या हयातींत जर तो कारखाना सुरू झाला

असता तर किती चांगलें झालें असतें ? परंतु तो योग नव्हता ! आज त्या कारखान्यामधून दररोज बाहेर पडणाऱ्या शुभ्र दाणेदार साखरेचा मोठा ढीग पाहिला म्हणजे पांढऱ्या पोषाखांत असलेली दादांची भव्य मूर्ति डोळ्यापुढें उभी राहते !

भारत हा कृषिप्रधान देश आहे. भारतांतील शेतीच्या व्यवसायाची जर उन्नति झाली, तरच या देशाची उन्नति व्हायची. यासाठीं प्रत्येक शेतकरी सुशिक्षित व सुसंस्कृत होणें आवश्यक आहे. दादांच्यासारखे शेतकरी जेव्हां भारतांत निर्माण होतील, तेव्हांच खरा आपल्या देशाचा उद्धार होईल. दादा फार शिकलेले नव्हते. परंतु त्यांच्या ठिकाणीं महत्त्वाकांक्षा, उद्योगशीलता, निरलसपणा, चिकाटी, अभ्यासूपणा व हिशेबीपणा इत्यादि गुण होते. त्याच गुणांनीं त्यांना येवढ्या पदवीला पोहोंचविलें. म्हणूनच त्यांचें जीवन—ज्यांना आदर्श शेतकरी व्हावयाचें आहे त्यांनीं सतत डोळ्यापुढें ठेवलें पाहिजे. तें सतत प्रकाश देऊन आदर्श भारतीय शेतकरी निर्माण करील, त्याला देशसेवेस प्रेरित करील.

BVBK-0401234
BVBK-0401234
९२३४ दि. २०।५।९७
बा. वा.

# कांहीं तरी नवेंच करा

जीवनाची ठराविक चाकोरी सोडून—'कांहीं तरी नवेंच' करण्याची ईर्षा बाळगली आणि तत्सिद्ध्यर्थ विशिष्ट जीवनक्षेत्रांत अलौकिक कर्तृत्व केलें अशांची चरित्रें.

तीस मिनिटांत वाचून होणारीं पुस्तकें : शालेय-वर्गग्रंथालयासाठीं योजना

१. असा असतो देशभक्त : कोतवाल
२. गुलाम बंड करतो : स्पार्टकस
३. रा. शिक्षणाचा ध्यास : विजापूरकर
४. कादंबरीकार हरीभाऊ : आपटे
५. मराठी नटसम्राट : गण. जोशी
६. व्यायाम भीष्माचार्य : माणिकराव
७. लष्करी संघटक : क. लॉरेन्स
८. अलौकिक शिल्पकार : एंजलो
९. चित्रपट महर्षि : दादासाहेब फाळके
१०. इतिहासाचार्य राजवाडे : राजवाडे
११. बंदीजनांची माउली : फ्राय
१२. देशासाठीं दर्यापार : जेम्स कुक
१३. वीरबाला झोया : ( रशिया )
१४. बहादूर शिकारी : जिम कॉर्बेट
१५. कोई बी चीज उठाव : वुलवर्थ
१६. वीरपत्नी राणी दुर्गावती :
१७. विख्यात वकील : बॅ. जयकर
१८. विलक्षण वार्ताहर : अर्नेस्ट पाइल
१९. भारतीय चित्रकार : रविवर्मा
२०. मराठी मुद्रण-प्राणदाता : जावजी
२१. राजमाता जीजाबाई
२२. स्वदेशी कारखानदार : अंताजी काळे
२३. भव्य स्थापत्य : फर्डिनांड द लेसेप्स
२४. सर्कसबहाद्दर : विष्णुपंत छत्रे
२५. भक्तिवेडी बहिणा : बहिणाबाई
२६. सद्‌गुणी बनण्याची कला : फ्रँकलिन
२७. भारत-कवि टागोर : रवींद्रनाथ
२८. कोशकार केतकर : डॉ. केतकर
२९. कृषिपंडित : दादासाहेब शेंबेकर
३०. खरा खेळाडू : पी. बाळू
३१. चिरंजीव मरण : मदनलाल धिंग्रा
३२. विमामहर्षि : अण्णासाहेब चिरमुले
३३. तेजस्वी धर्मोद्धारक : शंकराचार्य
३४. बंडखोर लोककवि : अनंत फंदी
३५. साकार संगीत : पं. पलुस्करबुवा
३६. साहसी वैमानिक : सँटा ड्युमाँ
३७. दरियाचा राजा : कान्होजी आंग्रे
३८. जमिनीचा जादूगार : डॉ. कार्व्हर
३९. लाखांचा प्राणदाता : लुई पाश्चर
४० शिक्षण-भगीरथ : भाऊराव पाटील
४१. मराठी-मुद्रक : गणपत कृष्णाजी
४२. बर्फांतला माणूस : हिलरी
४३. प्राणावरचा प्रवास : शिफले
४४. दानशूर कुबेर : रॉकफेलर
४५. प्रवासी पंडित : ह्युएनत्संग
४६. नृपनिर्माता : आर्य चाणक्य
४७. असामान्य क्रिकेटपटु : ब्रॅडमन
४८. लोकहिताचा संरक्षक : वि. पटेल
४९. पहिला मिशनरी : गजाननराव वैद्य
५०. तुम्हांला कोण व्हावेंसें वाटतें ?

प्रत्येक पुस्तक पन्नास नये पैसे : संच पेटी रु. २५.

व्होरा ॲण्ड कंपनी पब्लिशर्स प्रायव्हेट लिमिटेड, मुंबई २.